**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**
**वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा**

इतिवृत्त

शुक्रवार दि. 07 एप्रिल, 2017 रोजी सकाळी 11.30 वाजता वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा परिषदेची सभा आयोजीत करण्यात आली. सदर बैठकिस खालील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1.मा. डॉ. पंडित पलांडे, संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | अध्यक्ष |
| 2.डॉ. महेश कुलकर्णी, नाशिक | सदस्य |
| 3.डॉ. अरविंद्र बोंद्रे, नागपूर | सदस्य |
| 4.डॉ. कविता साळुंके, सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा | सदस्य |
| 5.डॉ. उमेश राजदेरकर, सहयोगी प्राध्यापक, मानवविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा | सदस्य |
| 6.श्री. राजेंद्र वाघ, सहा प्राध्यापक | सदस्य |
| 7.डॉ. सुरेंद्र पाटोळे, सहा. प्राध्यापक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| 8.डॉ. लतिका अजबानी, सहा प्राध्यापक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| 9.डॉ. एम जी गायकवाड, एम के सी एल, | निमंत्रीत सदस्य |
| 10.श्रीय अविनाश देशमुख, एमकेसीएल, | निमंत्रीत सदस्य, |
| 11.डॉ. अर्जुन घाटोळे, परीक्षा नियंत्रक, | निमंत्रीत सदस्य |

सभेच्या सुरवातीला विद्याशाखेचे संचालक यांनी उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांचे स्वागत केले, डॉ. श्रीकांत जोशी, पुणे, डॉ. व्ही.एम. चव्हाण, कोल्हापूर, डॉ. राजश्री शिंदे, पुणे, डॉ. सी एम चितळे, पुणे, डॉ, जयदिप निकम, नाशिक, हे सदस्य काही अपरिहार्य कारणांमुळे सभेस उपस्थित राहू शकले नाहीत. सदर बैठकीस पुढील विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

| विषय क्र | तपशिल |
|---|---|
| वाणिज्य/2017 2.1 | **दि. 17 फेब्रुवारी, 2016 रोजी झालेल्या विद्याशाखा परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**<br><br>ठराव- दि. 17 फेब्रुवारी 2016 रोजी झालेल्या विद्याशाखा परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. |
| वाणिज्य/2017 2.2 | **विद्याशाखेमध्ये राबविण्यात येणा-या एम.बी.ए आणि एम कॉम शिक्षणक्रमासाठी सन 2017-18 साठी नवीन अभ्यासकेंद्रे देणे बाबत.**<br>**टिप्पणी- सध्या एम बी ए शिक्षणक्रमासाठी महाराष्ट्रात एकूण 100 इतके अभ्यासकेंद्र तसेच एम कॉम शिक्षणक्रमासाठी 59 इतके अभ्यासकेंद्रे आहेत. जून 2017 पासून वरील शिक्षणक्रमासाठी नविन अभ्यासकेंद्रे देण्याबाबत विविध संस्थांकडून विद्याशाखेस मागणी अर्ज प्राप्त झालेले आहेत. मागील वर्षी वरील शिक्षणक्रमासाठी नव्याने अभ्यासकेंद्रे देण्यात आलेली नाहीत. तसेच विद्याशाखेत चालविण्यात येणा-या इतर शिक्षणक्रमाच्या जसे बी.कॉम, बी.कॉम -सहकार व्यवस्थापन पदवी व सहकार व्यवस्थापन पदवीका यांचे ही नविन अभ्यासकेंद्रसाठी मागणी येत आहे.** BBA -Aviation, Hospitality and Travel and Tourism Management, Diploma in - Aviation, Hospitality and Travel and Tourism Management **हे शिक्षणक्रम शैक्षणिक वर्ष 2015-16 मध्ये प्रायोगीक तत्वावर सुरु करण्यात आले होते. सदर शिक्षणक्रमास संबंध महाराष्ट्रातून विद्यार्थांची मागणी वाढत आहे त्यामुळे सन 2017-18 पासून ज्या ज्या अभ्यासकेंद्रांनी या शिकक्षणक्रमाचे नवीन अ्यासकेंद्र मागीतले आहेत त्यांचे प्रस्ताव स्विकारुन नविन अभ्यासकेंद्र देण्याची प्रक्रिया पूर्ण करावी असा विषय सभेसमोर चर्चेसाठी ठेवण्यात आला.**<br>**यंदाच्या वर्षी नव्याने अभ्यासकेंद्रे देणेबाबत मंजूरी मिळणेबाबत प्रस्ताव सादर. सहपत्र 1**<br><br>ठराव- सन 2017-18 साठी एम बी ए व एम कॉम शिक्षणक्रम तसेच विद्याशाखेअंतर्गत असलेल्या सर्व शिक्षणक्रम राबविण्यासाठी नविन अभ्यासकेंद्र देणेबाबत मंजूरी देण्यात आली. परंतू एम.बी.ए व एम कॉम. अभ्यासक्रम सोडून इतर कुठल्याही शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र देण्यासाठी कमीत कमी कनिष्ठ महाविद्यालय असणे आवश्यक आहे असे ठरले. एम बी ए व एम कॉम शिक्षणक्रमाचे नविन अभ्यासकेंद्र देण्यासाठी कमित कमी वरिष्ठ महाविद्यालय ( सिनिअर कॉलेज) असणे गरजेचे आहे असे सर्वानुमते ठरले. तसेच BBA Aviation, Hospitality and Travel and Tourism managemtn, Diploma in -Aviation, Hospitality and Travel and Tourism management या शिक्षणक्रमासाठी कनिष्ठ किंवा वरिष्ठ महाविद्यालय असणे आवश्यक आहे असे सर्वानुमते ठरले. |

मा. कुलगुरू कार्यालय
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
आवक क्र.: 04/5683
दि. 08/05/17

| | |
|---|---|
| वाणिज्य/2017<br>2.3 | एम कॉम शिक्षणक्रमाच्या पहिल्या वर्षासाठी **Money Central Banking in India and International Financial Institution (COM 510)** या विषयाचे अध्ययन पुस्तक डॉ अशुतोष रारावीकर या लेखकाकडून लिहून घेतलेले असून त्याची छपाई अद्याप बाकी आहे. पुस्ताकाचे कॉपीराईट सर्व विद्यापीठाकडे असून ते भविष्यात छपाई करुन घेतले जातील. यासाठी डॉ, अशुतोष रारावीकर यांनी लिहीलेल्या 08 युनिट्यचे बील देणे बाकी आहे. मंजूरी साठी प्रस्ताव सादर. सहपत्र 2<br><br>ठराव- डॉ अशुतोष रारावीकर यांनी लिहिलेल्या एम कॉम शिक्षणक्राच्या कॉमर्स 510 पुस्तकाचे 08 युनिट्यचे बील त्यांना देण्यास प्रस्तावास मंजूरी देण्यात आली. |
| वाणिज्य/2017<br>2.4 | एम बी ए शिपींग शिक्षणक्रमात संदर्भात दि. 02.09.2016 च्या पत्रावर चर्चाकरुन निर्णय घेणे. सहपत्र 3<br><br>ठराव- सदर शिक्षणक्रमासंदर्भत एकूण आठावा घेण्यासाठी शिपींग कॉपोरेशन ऑफ इंडिया येथील अधीका-यांशी बैठक करुन आढावा घेतला जाईल. त्यानंतर हा शिक्षणक्रम भविष्यात चालू ठेवायचा का नाही याबाबत निर्णय घेण्यात येईल. असे सर्वानुमते ठरले. |
| वाणिज्य/2017<br>2.5 | सहकार व्यवस्थापन पदवीका, बँकींग, दुग्ध, पदवी शिक्षणक्रमाच्या स्थिती अभ्यासाचे मूल्यमापन सन 2017-18 पासून अभ्यासकेंद्रावर करणेबाबत..<br>टिपणीः- वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेंअंतर्गत सहकार व्यवस्थापन पदविका बँकींग, दुग्ध व्यवसाय, तसेच सहकार व्यवस्थापन पदवी हे शिक्षणक्रम चालविले जातात. सदर शिक्षणक्रमाच्या प्रत्येक विद्यार्थास त्यांच्या विषयाशी निगडीत स्थिती अभ्यास विद्यीठास सादर करावे लागतात. सध्या या स्थिती अभ्यासाचे मूल्यामापन परीक्षा विभागाकडून केले जाते. स्थिती अभ्यास मात्र अभ्यासकेंद्राकडून विद्याशाखेकडे पाठविले जातात. त्यानंतर परीक्षाकक्ष बहिस्थ परीक्षकांना विद्याशाखेकडे पाठवून त्याचे मूल्यामापन करुन घेते. बहिस्थ परीक्षक त्याचे गुणदान पुन्हा परीक्षाविभागाकडे पाठवितात.<br>यासर्व प्रक्रीयेत ब-याचवेळेस असे होते की काही विद्यार्थांचे स्थिती अभ्यास विद्याशाखेस प्राप्त झालेले नसतात. अभ्यासकेंद्र कळवितात की ते त्यांनी पाठविलेले आहे. स्थिती अभ्यास विद्याशाखेत प्राप्त होतात त्यामुळे परीक्षाविभाग कळविते की आमच्याकडे स्थिती अभ्यास येतच नाही या सर्व प्रकारामुळे ब-याच विद्यार्थांना त्यांच्या स्थिती अभ्यासाचे गुणदान होत नाही. परीणामी निकाल लागण्यात विलंबहोतो व विद्यार्थाचे शैक्षणिक नुकसान होते.<br>विद्यार्थाचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी सन 2017-18 पासून सहकार व्यवस्थापन पदविका बँकींग, दुग्ध, सहकार व्यवस्थापन पदवी या सर्व शिक्षणक्रमाच्या स्थिती अभ्यासक्रमाचे मूल्यमापन संबंधीत अभ्यासकेंद्रानेच करावे व अंतीण गुण परीक्षा विभागाकडे पाठवावेत असे प्रस्तावित करण्यात येत आहे.<br><br>ठराव-स्थिती अभ्यास हे अभ्यासकेंद्रांकडून विद्याशाखेत मागविण्यापेक्षा परीक्षा कक्षाकडे मागवावेत व सध्याच्या मुल्यमापनाच्या पद्धतीनुसार परीक्षा विभागाने तपासून घ्यावेत. तसेच एम बी ए शिक्षणक्रमाचे प्रोजेक्ट रिपोर्टचे काम हे 2017-18 तुकडीपासून मुल्यमापनाचे काम हे विद्याशाखेतून करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले. |
| वाणिज्य/2017<br>2.6 | बी.बी. ए शिक्षणक्रमाच्या चौथ्या सत्राच्या लेखक व संपादकांच्या नावांना मान्यता देणे<br><br>ठराव- बी बी ए शिक्षणक्रमाच्या चौथ्या सत्राच्या लेखक व संपादकांच्या नावांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| वाणिज्य/2017<br>2.7 | बहाय ॲकेडमी, पंचगणी, सातारा यांचे एम बी ए च्या विद्यार्थांना **Leadership for Change** हा अभ्यासक्रम देण्यासंदर्भात चर्चा करुन निर्णय घेणे .<br>सहपत्र 4<br><br>ठराव- या संदर्भात संबंधीत संस्थेचा प्रस्ताव मान्य करण्यात आला. या संस्थेच्या अधिका-यांना मुख्यालयात बोलवून सविस्तर चर्चाकरुन त्यानंतर सदर विषय विद्वतपरिषदेच्या मान्यतेसाठी पाठविण्यात येईल असे ठरले. |
| वाणिज्य/2017<br>2.8 | Indian Institute of Material Management यांनी प्रस्तावीत केलेल्या MBA in Material Management हा शिक्षणक्रम संयुक्तपणे राबविण्याच्या बाबत चर्चा करुन निर्णय घेणे. सहपत्र 5<br><br>ठराव- सदर विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली परंतू अशा प्रकारचे शिक्षणक्रम संयुक्त पणे राबविण्यात शैक्षणिक अडचणी येत असल्याने सदर विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आला. |

मा. कुलगुरु कार्यालय

| | |
|---|---|
| वाणिज्य/2017<br>2.9 | **एम.कॉम शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी शैक्षणिक पात्रता निकष ठरविणे बाबत..**<br><br>ठराव-या शिक्षणक्रमास बी.कॉम, बीबीए, बीबीएम, बी.एम.एस हे शिक्षणक्रम पुर्ण केलेल्या विद्यार्थांना एम कॉम शिक्षणक्रमास प्रवेश देता येईल, असे सर्वानुमते ठरले. |
| वाणिज्य82017<br>2.10 | **विद्याशाखेतर्फे विकसीत करण्यात आलेल्या डिप्लोमा इन ऑपरेशन्स मॅनेजमेंन्ट (महेंद्र ॲन्ड महेंद्र लि. नागपूर यांचे साठी सुरु केलेला) शिक्षणक्रम तसेच एम बी ए व एम कॉम शिक्षणक्रमातील अध्ययन पुस्तकातील credit page बाबत व शालेय अर्थिक व्यवस्थापन पुस्तकांतील बदल, वरील तीनही शिक्षणक्रमातील पुस्तकामधील झालेल्या त्रुटींबाबत सविस्तर चर्चा करुन निर्णय घेणे.**<br><br>ठराव-सदर विषयावर विद्याशाखा परीषदेत सविस्तर चर्चा करण्यात आली. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत सन 2015 ते 20 जानेवारी 2017 या कालवधीत शालेय अर्थिक व्यवस्थापन व Diploma in Operations Management हे दोन नवीन शिक्षणक्रम सुरु केले.सदर दोन्ही शिक्षमक्रमाच्या महात्वाचे कागदपत्रे तसेत अध्ययन साहित्य विद्याशाखा परिषदेपुढे माहितीस्तव ठेवण्यात आले होते.हे साहित्य हाताळल्यानंतर विद्याशाखा परिषदेस खालील प्रमाणे काही बाबी निदर्शनस आल्यात.<br>या दोन शिक्षणक्रमांपैकी शालेय अर्थिक व्यवस्थापन हा शिक्षणक्रम शाळेतील कर्मचा-यांसाठी अमरावती येथील श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या सहकार्याने सुरु करण्यात आला. सदर शिक्षणक्रम वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत सुरु करुनही या शिक्षणक्रमाच्या पाठ्यपुस्तकांवर वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचा कुठेही साधा नामोल्लेख केलेला नाही.हा शिक्षणक्रम विद्याशाखेने तयार केलेला आहे. या पाठ्यपुस्तकांच्या मुखपृष्ठावर विद्यापीठाचा लोगो व नावाखालील श्री शिवाजी लोकविद्यापीठ, अमरावती यांचा लोगो व त्यांचे नाव छापण्यात आलेले आहे.त्यामुळे पुस्तके विद्यापीठाची आहेत की या खाजगी लोकविद्यापीठाची याचा उलगडा होत नाही. हे सर्व विद्यापीठाच्या एकुणच धोरणाच्या विसंगत आहे. असे मत विद्याशाखा परिषदेने नोंदवीले. याच कालवधीत विद्याशाखेत नागपूर येथील महेंद्र ॲन्ड महेंद्र या खाजगी कंपनीच्या सहकार्याने Diploma in Operations Management हा शिक्षणक्रम सुरु करण्यात आला. या शिक्षणक्रमाची संपूर्ण पाठ्यपुस्तके विद्यापीठाने विकसीत केली आहे. परंतु सर्व पाठ्यपुस्तकांच्या मुखपृष्ठावर महेंद्र ॲन्ड महेंद्र या कंपनीच्या ट्रॅक्टरचा फोटो छापण्यात आलेला आहे. ज्यावर महेंद्र हे नाव स्पष्ट दिसते. यातून महेंद्र ॲन्ड महेंद्र कंपनीचा ट्रॅक्टर ची जाहिरात होत आहे असे विद्याशाखा परिषदेस जाणविले. या सर्व घटनांमध्ये विद्यापीठाला मोठ्या प्रमाणावर आर्थिक गुंतवणूक देखील करावी लागली आहे असे प्रथमदर्शनि निदर्शनास आले.त्यामुळे **या सर्व बाबींचा सखोल अभ्यासकरुन अंतीम निर्णय घेण्यासाठी विद्यासाखा परिषदेतील दोन सदस्य डॉ. व्ही एम चव्हाण. कोल्हापूर आणि डॉ. राजश्री शिंदे, पुणे या द्विसदस्य समितीची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदंर समिती सखोल चौकशी नंतर त्याचा अहवाल विद्याशाखेत सादर करेल, त्यानंतर अंतीम निर्णय घेण्यात येईल. असे सर्वानुमते ठरले.** |
| वाणिज्य82017<br>2.11 | DCM Banking/Dairy (Credit Transfer) विषयाची online नोंदणी करणेबाबत..<br><br>ठराव- DCM हा शिक्षणक्रम पुर्ण करुन DCM Banking/Dairy या पदवीका शिक्षणक्रमास नोंदणी करणा-या विद्यार्थांसाठी परीक्षा विभागाने स्वतंत्र software मध्ये बदल करुन त्यांची नोंदणी सन 2017-18 पासून online करावा असे सर्वानुमते ठरले. सदरची पुर्ण कार्यवाही परीक्षा विभागाने करावी. |

दि. 08.04.2017

अध्यक्ष 8/05/17
वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा

मा. कुलगुरुंच्या मान्यतेसाठी सविनय सादर.

8/05/17

Vayunandan
9/5/2017